दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | बुधवार दि.४ डिसेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -९९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## लोकशाहीचा खून झाला तर राज्य घटनेला अर्थ उरणार नाही–चव्हाण


**मुंबई (वृत्तसंस्था)**–ईव्हीएममध्ये पोग्रामिंग करणे शक्य आहे. जगातील प्रगत देशांमध्ये ईव्हीएमवर निवडणुका होत नाहीत. भारतात हट्टाने ईव्हीएमवर निवडणुका घेतल्या जात आहेत. भारतातील लोकशाही टिकावी, ही जगातील लोकशाही प्रेमी नागरिकांची इच्छा आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत आणि निकालाबाबत सामान्य नागरिकांच्या मनात संशयाचे वातावरण आहे. केंद्रीय निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारने जनतेमधील संशय दूर केला पाहिजे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले.अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या माजी अध्यक्षा, सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा, कर्तव्य आणि त्याग सप्ताहाचे उद्घाटन पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार रवींद्र घंगेकर, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस संजय बालगुडे , माजी नगरसेविका लता राजगुरू, अविनाश बागवे, दत्ता बहिरट , सौरभ अमराळे, सदानंद शेट्टी, कैलास कदम आणि सप्ताहाचे आयोजक व माजी आमदार, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यावेळी उपस्थित होते.

# पत्रकारांच्या भावना दुखावणे हेतू नव्हता दिलगीर आहे–खा.बजरंग सोनवणे



**केज । प्रतिनिधी**

आ संदीप क्षीरसागर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त करताना अनावधानाने आपले बाबद संशय निर्माण करणारी बातमी कुणाला संशय आला म्हणून केल्याचे आपण म्हटले. यावेळी आपण केज मतदार संघात जीवाचे रान करत प्रचार केला व प्रचार यंत्रणा सांभाळली असे असताना माझ्या भूमिकेवर संशय निर्माण करणारी बातमी देखील माझ्या सारख्या कार्यकर्त्यास मनस्ताप देणारी ठरली. यातून सदरील पत्रकार मित्राकडे तक्रार वजा बोलताना संशय आपणास का घरच्या कुणाला आला असे म्हटले गेले. यावेळी उल्लेख केलेल्या शब्दानी कुणाच्या भावना दुखाव्यात अशी आपली अजिबात इच्छा अपेक्षा नव्हती. मात्र याने माझ्या राजकीय प्रवासात माझ्या सोबत कायम राहिलेल्या माझ्या अनेक सहकारी मित्रांचे मन दुखावले. अश्या सर्व माझ्या मित्राकडे मी दिलगिरी व्यक्त करतो. माझ्या पत्रकार मित्राना दिलगिरी सोबतच हे आवाहन करतो की आपण माझे टिकाकार सल्लागार आहात मी टिकेचे आणी सल्याचे नेहमी स्वागत करत आलोय पुढेही करणारच आहे मात्र आपल्यातील निवडक मित्र ठरवून बदनामी संशय निर्माण करत असतील तर आपण पत्रकार म्हणून अश्या मित्रांना योग्य मार्गदर्शन करावे.मला विश्वास आहे आज ज्या प्रमाणे माझ्याकडे आपण व्यक्त झालात असेच भविष्यात चुकीच्या बातमीला बंध घालाल.बाकी मी माझ्या वक्तव्याने कुणाचे मन दुखावले बाबद दिलगिरी व्यक्त करत आहे. असे एका पत्रकाव्दारे प्रसिद्ध केले आहे.


Bajrang Manohar Sonwane
Member of Parliament- Loksabha
39-Beed, Maharashtra
Mobile : 9960101616

बजरंग मनोहर सोनवणे
संसद सदस्य - लोकसभा
३९ - बीड, महाराष्ट्र
मो. ९९६०१०१६१६

सत्यमेव जयते

दिनांक : 03/12/2024

प्रेस नोट

**पत्रकारांच्या भावना दुखावणे हेतू नव्हता. दिलगीर आहे - खा. बजरंग सोनवणे**

- आ संदीप क्षीरसागर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त करत असताना माझ्याबाबत संशय निर्माण करणारी बातमी कुणाला संशय आला म्हणून केल्याचे आपण विचारले. केज विधानसभा मतदार संघात जीवाचे रान करत प्रचार केला व प्रचार यंत्रणा सांभाळली असे असताना माझ्या भूमिकेवर संशय निर्माण करणारी ती विशिष्ठ बातमी माझ्या सारख्या कार्यकर्त्यास अत्यन्त मनस्ताप देणारी ठरली. यातून सदरील पत्रकार मित्राकडे तक्रारवजा बोलताना संशय आपणास का घरच्या कुणाला आला असे आपणा सर्वांशी असलेल्या कौटुंबिकपणाच्या भावनेतून अनावधानाने म्हटले गेले. यावेळी उल्लेख केलेल्या शब्दानी कुणाच्या भावना दुखाव्यात असा माझा अजिबात हेतू नव्हता. मात्र याने माझ्या राजकीय प्रवासात माझ्या सोबत कायम राहिलेल्या माझ्या अनेक सहकारी मित्रांचे मन दुखावले. अशा सर्व माझ्या मित्रांकडे मी दिलगिरी व्यक्त करतो. माझ्या पत्रकार मित्राना दिलगिरी सोबतच हे आवाहन करतो की आपण माझे टीकाकार/सल्लागार आहात. मी टिकेचे आणि सल्ल्याचे नेहमी स्वागतच करत आलोय. पुढेही करणार आहे. मात्र आपल्यातीलच कोणी ठरवून बदनामीकारक किंवा संशय निर्माण करणारे वार्तांकन विशेषकरुन निवडणूक काळात करत असतील तर आपण पत्रकार म्हणून अशा मित्रांना योग्य मार्गदर्शन करावे. मला विश्वास आहे आज ज्या प्रमाणे माझ्याकडे आपण व्यक्त झालात असेच भविष्यात चुकीच्या बातमीला बंधन घालाल.

माझ्या वक्तव्याने कुणाचे मन दुखावले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करत आहे.

आपलाच,
खा. बजरंग सोनवणे

प्रति,
मा. संपादक,

Delhi : New Maharashtra Sadan, Kasturba Gandhi Marg, New Delhi-110001
दिल्ली : नवीन महाराष्ट्र सदन, कस्तुरबा गान्धी मार्ग, न्यु दिल्ली - ११०००१
Resi./Office : Pavansoot Niwas, Dharur Road, Kaij, Dist. : Beed, Maharashtra Ph.: 02445-251316 Email : officeofbms@gmail.com
निवास/ऑफिस : पवनसूत निवास, धारूर रोड, कैज, जिल्हा-बीड, महाराष्ट्र, फोन - ०२४४५–२५१३१६

## दहशतवादाला आर्थिक पाठबळ देणारे ऑनलाइन जुगार

# अवैध सट्टेबाजी निर्बंधासाठी खा.डॉ अजित गोपछडे यांनी राज्यसभेचे वेधले लक्ष

**नांदेड । हानुमंत चंदनकर**

देशातील अवैध ऑनलाईन जुगार खेळ आणि अवैध सट्टेबाजी व्यवहारातून दहशतवादाला आर्थिक पाठबळ मिळत आहे याविषयी खा.डॉ.अजित गोपछडे यांनी राज्यसभेमध्ये चिंता व्यक्त केली.

राष्ट्रीय रक्षा विश्वविद्यालय सुरक्षा व वैज्ञानिकीय तकनिकिय अनुसंसाधन केंद्र यांच्या रिपोर्टनुसार अशी माहिती मिळाली की,अवैध ऑनलाईन सट्टेबाजी व जुगार खेळा संबंधित कंपन्या मनी लॉन्ड्रीग सारख्या माध्यमातून आतंकवादाला आर्थिक मदत करीत आहेत , आतंकवाद्यांसाठी पैसे मिळवण्याचे एक साधन म्हणून काम करत असल्याची शंकाही त्यांनी व्यक्त केली आहे .भारतातील कोट्यावधी डिजिटल प्लॅटफॉर्म वापरणाऱ्या नागरिकांना सायबर सुरक्षितेच्या माध्यमातून असुरक्षितता निर्माण होत आहे, ही चिंतेची बाब आहे. अनेकांची यामध्ये फसवणूक होत आहे. हे अवैध व्यवसाय भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी अधिक धोकादायक बनले आहेत. याचे कारण की, या अवैध सट्टेबाज व जुगार कंपन्या आतंकवादासाठी अवैध मार्गाने पैसे कमवण्याचे माध्यम होऊन काम करत आहेत. एस ए एस. टी. आर. ए अहवालानुसार वर्तमान कायदा आणि नियम अवैध सट्टेबाज रोखण्यात अयशस्वी ठरत असून अवैध सट्टेबाजी व




ऑनलाईन जुगार प कंपन्यांना अवैध मार्गाने पैसे कमवण्याचे व पैसे वळवणे सोपे जात आहेत. ते रोखण्यात सध्याचे कायदे व नियम कमी पडत असल्याचेही खा. डॉ. गोपछडे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.अवैध जुगार कंपन्या आपले सट्टेबाज प व जुगार प भारतभर पसरण्यासाठी कायद्याच्या नियमावर बोट ठेवून मधला मार्ग वापरून जाहिराती करून लोकांना फसवत आहेत.

भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेतेसाठी भारत सरकारला वरील विविध महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करून कडक कायदे करून कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासाठी प्रभावी उपाययोजना करावी अशी विनंती खा. डॉ. अजित गोपछडे यांनी राज्यसभेच्या सभापतींकडे केली आहे.

## केज येथे पत्रकारांची आरोग्य तपासणी संपन्न

# मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त राज्यभरात राबविण्यात येतो हा उपक्रम

**केज । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापनदिन निमित्ताने राज्यातील सर्व पत्रकारांची आरोग्य तपासणी केली जाते. यावर्षी दहा हजार पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याची संकल्पना परिषदेचे विश्वस्त मा. एस. एम. देशमुख सर यांनी मांडली होती. याच अनुशंगाने केज येथे सर्व पत्रकार बांधवांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

धावपळीच्या जिवनात पत्रकारांनी आपली काळजी घ्यावी, दरवर्षी आरोग्य तपासणी करून काही समस्या असल्यास वेळेत उपचार सुरू करून आपले जीवन सुरक्षित करावे यासाठी हा उपक्रम राबविला जातो. तसेच पत्रकारांना काही आजाराची लक्षणे दिसून आले तर पुढील उपचारासाठी परिषदेच्या वतीने सर्व सहकार्य केले जाते. ३ डिसेंबर मराठी पत्रकार परिषदेच्या



वर्धापनदिनानिमित्त केज येथे ही पत्रकार यांनी आरोग्य शिबीरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली तपासणी करून घेतली. उपजिल्हा रूग्णालय केज येथे पत्रकारांच्या आवश्यक सर्व तपासणी करून सहकार्य केले गेले. वैद्यकीय अधिक्षक, डॉ. केंद्रे सर, डॉ. मुंडे सर, नागरगोजे सर व सर्व वैद्यकीय कर्मचारी, स्टाफ यांचा पत्रकारांच्या वतीने सत्कार करून आभार मानण्यात आले. यावेळी केज तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सर्व पदाधिकारी, सदस्य व सर्व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# आज पासून ईव्हीएमविरोधात वंचित बहुजन आघाडी उभारणार जनआंदोलन!

## राज्यभरात स्वाक्षरी मोहीम राबवून आंदोलनाची सुरुवात–प्रकाश आंबेडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभरात ईव्हीएम विरोधी जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरुवात करून टप्पा टप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राज्यात ईव्हीएम विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी व्हिडिओच्या माध्यमातून राज्यातील मतदारांना एतच् विरोधात स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. २००४ पासून ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात एतच् विरोधात आंदोलन करण्यात येत आहे.ईव्हीएमच्या विरोधात न्यायालयीन लढाई सुद्धा ते लढत आहेत. पत्रकार परिषदेच्या माध्यमातून एतच् वापरामधील मधील अनेक घोळ त्यांनी माध्यमासमोर मांडले आहेत. ईव्हीएमच्या विरोधात आरपारची लढाई लढण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला आहे.



## करंजा गावातील ११ वर्षीय मयंक म्हात्रे यांनी रचला नवा इतिहास

# घारापुरी ते करंजा जेट्टी १८ किलोमीटरचा प्रवास ५ तास २९ मिनिटात समुद्रात पोहून केला विक्रम


## मयंक वर विविध क्षेत्रातून शुभेच्छा व कौतुकांचा वर्षाव

**उरण । प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील करंजा येथील सुपुत्र, प्रसिद्ध जलतरणपटू मयंक म्हात्रे (वय ११)याने मंगळवार दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी मध्यरात्री १:०४ मिनिटाने प्रसिद्ध घारापुरी बंदर येथून समुद्रातील लाटांना आव्हान देत रात्रभर सतत पोहत सकाळी ७ वाजण्याच्या अगोदरच करंजा जेट्टी येथे पोहोचला. उरण तालुक्यातील घारापुरी बंदर ते करंजा जेट्टी हे सागरी १८ किलोमीटर अंतर निर्धारित वेळेपेक्षा कमी वेळेत पोहून पार करत पुन्हा एकदा नवा इतिहास घडवीला आहे.गेल्यावर्षी मयंकने ३ डिसेंबर २०२३ रोजी धरमतर ते करंजा जेट्टी हा प्रवाह (चॅनेल )पोहून पार केला. तेव्हाही त्याने विक्रम केला होता. आता घारापुरी ते करंजा हा प्रवाह (चॅनेल )पोहून जाणारा मयंक म्हात्रे हा पहिला जलतरण पटू आहे. धरमतर ते करंजा जेट्टी पोहून जाणारा व घारापुरी ते करंजा जेट्टी पोहून जाणारा मयंक म्हात्रे हा पहिलाच व एकमेव जलतरणपटू आहे. हे दोन्ही प्रवाह (चॅनेल )सर्वप्रथम पोहण्याचे नवीन विक्रम मयंक म्हात्रे याच्या नावावर आहेत. त्यामुळे मयंक म्हात्रे याचे नाव या चॅनेल वर प्रथम जलतरण पटू म्हणून कायमचे कोरले गेले आहे.

११ वर्षीय मयंक म्हात्रे हा सेंटमेरी कॉन्व्हेंट स्कूल उरण येथे शिकत असून कोंढरीपाडा करंजा येथे तो वास्तव्यास आहे. दररोज ५-५ तास तो पोहण्याचा सराव करत असे. त्यातून सर्वांच्या मार्गदर्शनामुळे ३ डिसेंबर २०२४ रोजी उरण तालुक्यातील घारापुरी ते करंजा जेट्टी हा समूद्रातील प्रवाह( चॅनेल )पोहून त्यांनी नवा विक्रम केला आहे.

घारापुरी ते करंजा हे अंतर सहा तासाच्या आत पूर्ण अपेक्षित होते मात्र मयंकने ते अंतर पाच तास २९



मिनिटात पूर्ण केले. गेल्यावर्षी धरमतर तर ते करंजा जेट्टी कमी वेळेत व कमी वयातील जलतरणपटू म्हणून पोहण्याचा विक्रम केला तसेच ३ डिसेंबर २०२४ रोजी घारापुरी ते करंजा जेट्टी कमी वेळेत, कमी वयात पूर्ण केल्याचे दोन्ही रेकॉर्ड मयंक म्हात्रे यांच्या नावावर आहेत. या दोन्ही मार्गावर पोहणारा तो सर्वप्रथम जलतरणपटू ठरला आहे. इतिहासात याची कायमची नोंद होणार आहे.मयंक म्हात्रे करंजा जेट्टी येथे सकाळी पोहोचताच करंजाचे ग्रामस्थ, विविध सामाजिक संस्था, संघटनांनी त्याचे ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत स्वागत केले.करंजा जेट्टी येथे मयंक म्हात्रे याचा छोटे खाणी सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते प्रितम म्हात्रे,शेतकरी कामगार पक्षाच्या महिला उरण तालुका अध्यक्ष सीमा घरत,सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर,महाराष्ट्र हौशी जलतरण संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष राजीव कोळी, संघटनेचे निरीक्षक शैलेश सिंग, एडवोकेट सागर कडू, प्राध्यापक एल बी पाटील, सामाजिक कार्यकर्ते सीताराम नाखवा, चाणजे ग्रामपंचायतचे सरपंच अजय म्हात्रे,सामाजिक कार्यकर्ते दिनेश थळी,नितीन कोळी, हेमलता पाटील, संजय ठाकूर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.मयंक म्हात्रे याला सुरवातीपासून त्याचे आई वीणा दिनेश म्हात्रे व वडील दिनेश म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले. मयंकच्या या ऐतिहासिक कामगिरीस प्रशिक्षक किशोर पाटील, प्रशिक्षक हितेश भोईर यांचे महत्वाचे मार्गदर्शन लाभले आहे तर उरण तालुका हौशी जलतरण संघटनेचे सचिव सुनिल पाटील, प्रशिक्षक मनोहर टेमकर, जलतरण पटू आर्यन मोडखरकर, जयदीप सिंग, वेदांत पाटील, रुद्राक्षी टेमकर, आर्य पाटील आदींचे सहकार्य या विक्रमा दरम्यान लाभले आहे. मयंक म्हात्रे याच्या आजपर्यंतच्या कामगिरीची दखल घेत त्याची निवड स्पर्धेसाठी सेंटमेरी स्कुलच्या माध्यमातून राज्यस्तरावर झाली आहे.उरण नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्हा, मुंबई जिल्ह्याचे नेतृत्व करणाऱ्या मयंक दिनेश म्हात्रे वर सर्वच क्षेत्रातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संपादकीय

# दैव देते अन...



भारताच्या इतिहासामध्ये बुधवारचा दिवस एका विचित्र कारणासाठी नोंदविला जाईल. ऑलिम्पिकसारख्या स्पर्धेमध्ये, कुस्तीत अंतिम फेरी गाठल्यानंतरही वजन जास्त भरल्यामुळे विनेश फोगटला बाद ठरविण्यात आले आणि कोट्यवधी भारतीयांच्या आशा-आकांक्षांचा चुराडा झाला. त्यानंतर देशात उमटलेल्या प्रतिक्रिया, खुलासे, प्रतिखुलासे, आक्षेप, समर्थन हे सगळेच अचंबित करणारे होते. वास्तविक, ऑलिम्पिकसारख्या स्पर्धामध्ये नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जाते, याचे ज्ञान विनेशसारख्या अनुभवी खेळाडूला, तिच्या प्रशिक्षकांना व साहायकांना नसेल, हे म्हणणे भाबडेपणाचे ठरेल. एकाच दिवसामध्ये तीन लढती जिंकल्यानंतर विनेश सुवर्णपदकाला गवसणी घालेल, अशी अपेक्षा असतानाच तिला बाद ठरविण्याचा जाहीर झालेला निर्णय धक्कादायक होताच; पण त्याचबरोबर कोणत्याही गोष्टीवरून राजकारण कसे करता येते, याचे उदाहरण दाखविणारा होता.

ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये वैयक्तिक खेळांत पदक मिळविणे वगैरे आपल्या देशात स्वप्नरूपातच होते. गेल्या शतकामध्ये भारताच्या नावावर वैयक्तिक पदके चार. यातील दोन स्वातंत्र्यपूर्व काळातील, त्यामुळे ती भारताच्या नावावर नोंदवायची किंवा नाही यावर वाद सुरू आहे. गेल्या पंचवीस वर्षांमध्ये आपल्याला खऱ्या अर्थाने वैयक्तिक पदकांची किंमत कळू लागली. त्या दृष्टीने गुंतवणुकीस प्रारंभ झाला. टोकियो ऑलिम्पिकमधील सात पदके ही आपली सर्वोच्च कमाई. या स्पर्धेमध्येही तशीच कामगिरी बजावण्याच्या अपेक्षेने भारतीय पथक पॅरिसमध्ये दाखल झाले. तीन पदकांची कमाई झाल्यानंतर, भारत हा आकडा सहज गाठेल असे वाटू लागले. त्यानंतर मात्र आपले खेळाडू मानसिक तयारीमध्ये कमी पडत असल्याचे चित्र निर्माण झाले. विनेशची गोष्ट आणखी वेगळी. भारतीय कुस्ती महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष ब्रिजभूषणसिंह यांच्या विरोधात कुस्तीगीर खेळाडूंनी आंदोलन केले; त्यामध्ये विनेश आघाडीवर होती. तो वाद अनेक दिवस चालला. त्यानंतर विनेशने स्पर्धेची तयारी केली. तिला आवश्यक प्रशिक्षक, आहारतज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट; तसेच परदेशातील प्रशिक्षण सरकारने उपलब्ध करून दिले. अर्थात, हे सगळे केल्याशिवाय पदकविजेते घडत नाहीत, हे आपल्याला उशिरा का होईना आता कळले आहे. हे झाल्यावर खेळाडूंची जबाबदारी सुरू होते. विनेशच्या बाबतीत स्पर्धेच्या आधी काही महिने खालच्या वजनगटात खेळण्याच्या निर्णयाने तिची जबाबदारी वाढविली.स्पर्धेच्या प्रारंभापूर्वी झालेल्या वजनचाचणीमध्ये उत्तीर्ण झाल्यानेच ती अंतिम फेरीपर्यंत धडक मारू शकली. मात्र, अंतिम फेरीपूर्वीची रात्र काळरात्र ठरली. तिचे वजन तब्बल दोन किलो सातशे ग्रॅमने वाढलेले आढळले. संपूर्ण रात्र विविध उपाय करूनही ते कमी झाले नाही; आपण खेळू शकणार नाही, हे विनेश आणि तिच्या सहकाऱ्यांना कळले होते. ऑलिम्पिक समितीने सकाळी त्यावर शिक्कामोर्तब केले. त्यानंतर भारतामध्ये प्रचंड प्रतिक्रिया उमटल्या. सुवर्णपदकांचा दुष्काळ असलेल्या आपल्या देशामध्ये ते अपेक्षित होते. राजकारण्यांच्या प्रतिक्रिया धक्कादायक होत्या. विनेशच्या विरोधात कारस्थान करण्यात आले आहे येथपासून आंदोलन केले म्हणून तिचा परस्पर काटा काढण्यात आला, येथपर्यंत प्रतिक्रिया नोंदवून राजकारण्यांनी आपली पातळी व लायकी दाखवून दिली. हा खेळ आहे; त्याचे काही नियम आहेत हे मान्यच करायला ही मंडळी तयार नव्हती. वास्तविक, विनेशबद्दल कितीही सहानुभूती वाटली, तरी शेवटी चूक तिच्याकडूनच झाली, हे लक्षात घेतले पाहिजे. त्याला जबाबदार कोण, यावर काथ्याकूट करून आता उपयोग नाही. झाले ते स्वीकारून पुढे जाण्याला पर्याय नाही. माजी बॅडमिंटनपटू प्रकाश पदुकोण यांनी दोनच दिवसांपूर्वी 'एक्स'वरून प्रतिक्रिया व्यक्त करताना, खेळाडूंनी आता जबाबदारी घेतली पाहिजे, असे वक्तव्य केले. प्रकाश बोलले त्यात तथ्य आहे.ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये सेकंदाच्या शतांश भागाने पदक गमाविण्याचा एकदा नव्हे, तर दोनदा अनुभव असलेल्या आपल्या खेळाडूंना ही स्पर्धा फक्त शारीरिक क्षमतेची नव्हे, तर त्यापेक्षा अधिक मानसिक क्षमतेची असते, याची जाणीव असायलाच हवी. ती मानसिक तयारी त्यांनाच करावी लागणार आहे. साधने, सोयीसुविधा पुरविण्यासाठी सरकार आहे, पुरस्कर्ते आहेत. मात्र, शेवटी विजय सोपानावर चढण्यासाठी लागणारी विजीगिष् वृत्ती आणि मानसिक संतुलन खेळाडूलाच कमवावे लागते. विनेशच्या प्रकरणातून हा धडा खेळाडू घेतील, अशी अपेक्षा करू या. एकूण हे प्रकरण म्हणजे दैव देते आणि कर्म नेते याचीच प्रचिती म्हटली पाहिजे.

# स्त्री-पुरुष सर्वांचा आंदोलनात सहभाग!

आजच्या दिवशी- दि.८ ऑगस्ट १९४२रोजी रात्रीपासूनच भारतीय स्वातंत्र्य लढ्याची मनसुबे तयार झालीत. महात्मा गांधीजींनी छोडो भारत व करेंगे या मरेंगेचा नारा दिला होता. यामुळे संपूर्ण देश पेटून उठला. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणार्या काँग्रेस आणि नेत्यांनी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे हा क्रांतीदिन म्हणून पुढे ओळखला जाऊ लागला. ८ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईतील शेवटचा दिवस म्हणूनही स्मरण केला जातो. म.गांधींच्या नेतृत्वात भारत छोडो आंदोलनाला या दिवशी सुरुवात झाली होती. त्यानंतर ९ ऑगस्ट रोजी गांधींसह ज्येष्ठ नेत्यांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण भारत इंग्रजांविरुद्ध एकवटला होता. देशावासियांच्या या एकजुटीने इंग्रज सरकारला गुडघे टेकायला भाग पाडले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यानंतर क्रांती दिन साजरा केला जाऊ लागला. मुंबईतील ज्या मैदानावर झेंडा फडकावत या आंदोलनाला सुरुवात झाली होती. त्या मैदानाला क्रांती मैदान हे नाव देण्यात आले आहे. भारतीयांनी पुकारलेला सन १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता. आज आपल्या देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या सर्व नाम-अनाम क्रांतीकारकांना विनम्र अभिवादन करुयात! असा हा श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींचा प्रेरणादायी लेख.... संपादक.

देशभरात ब्रिटिश सत्तेला हाकलून लावण्यासाठी पुढे आंदोलनांना सुरवात झाली. ब्रिटिश सत्ता पार हादरून गेली होती. हे रोखायचे कसे? असा प्रश्न त्यांना पडला होता. अशात हे आंदोलन देशभर पसरणार म्हणून ९ ऑगस्टच्या पहाटेच म.गांधी, पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांच्यासह अनके काँग्रेस नेत्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले. भारतीय जनमानसात असंतोषाचा विस्फोट झाला, त्यामुळे ब्रिटिश शासन भयभीत झाले. एकाच वेळी देशभर कारवाया सुरू झाल्या व महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना अटक सत्र सुरू केले अनेक नेते भूमिगत झाले. देशभर पोलीस ठाण्यावर व मामलेदार कचेरीवर, सरकारी कार्यालयांवर मोर्चे निघू लागले. युवक हातात तिरंगा झेंडा घेऊन घोषणा देत लाठीचार्ज व गोळीबार झेलत धैर्याने तिरंगा फडकवू लागले. समाजवाद्यांनी भूमिगत कारवायांवर लक्ष केले. रेल्वे स्थानके मोडतोड, रूळ उखडणे, पोस्ट कार्यालय जाळणे, वीज तोडणे, गनिमी पद्धतीने ही कामे सुरू झाली. पोलिसांकडून अटक सत्र सुरू झाले. व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार, सामान्य नागरिक, स्त्री-पुरुष सर्व या आंदोलनात सहभागी झाले. देशभरातील युवकांनी यात भाग घेतला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्फूर्तीदायी ठरलेल्या या दिवसाची आठवण तसेच नव्या पिढीला क्रांतिकारकांच्या त्यागाची जाणीव रहावी, यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन साजरा केला जातो.देशभर स्वातंत्र्याचे व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. चले जावमुळे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महाराष्ट्रात प्रतिसरकारची स्थापना केली. हे आंदोलन उभे राहण्याआधीच ब्रिटिश सरकारने मोडून काढण्याचे ठरवले होते. त्या पद्धतीने देशभर कारवाया केल्या व आंदोलन मोडून काढले. परंतु या आंदोलनाने जगाला वेगळी ओळख दिली. कारण कोणताच सेनापती नसताना स्वातंत्र्याचे युद्ध जनतेने हातात घेतले होते. यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचा विचार केला जाऊ लागला, हे विशेष. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दि.९ ऑगस्ट १९४२ या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी तत्कालीन काँग्रेसच्या नेतृत्वाने भारतातील इंग्रज सरकारला चले जावचा इशारा दिला. या दिवसापासून स्वातंत्र्यासाठी लढणार्या भारतीयांनी करेंगे या मरेंगे अशी निर्वाणीची भूमिका घेतली. इंग्रजांना छोडो भारत हा अखेरचा इशारा दिला होता. या आंदोलनाला गांधीजींनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबई अधिवेशनात सुरूवात केली होते. यामुळे जणू एक क्रांतीची जोतच पेटली होती. त्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून स्वातंत्र्य लढ्यात आपले योगदान देणाऱ्या सर्व थोर पुरूषांना विनंम्र अभिवादन!

देशभरात ऑगस्ट क्रांती दिन साजरा होत आहे. इंग्रजांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाला सुरुवात झाली होती. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वतंत्र करणार असल्याचे इंग्रजांनी म्हटले होते. मात्र ऐनवेळी इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे म.गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला भारत छोडो, असे नाव देण्यात आले होते. करो या मरो, अशी या आंदोलनाची घोषणा होती. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणाऱ्या काँग्रेस आणि थोर नेत्यानी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे ९ ऑगस्ट हा दिवस क्रांतिदिन म्हणून ओळखला जाऊ लागला. मात्र, इतकी कठोर भूमिका घेतल्या नंतर पाच वर्षांनी आपल्याला स्वातंत्र्य लाभले. दि. ९ ऑगस्ट १९४२ ते १५ ऑगस्ट १९४७ हा कालावधी प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवायला हवा, इतका तो ऐतिहासिक आणि महत्त्वाचा आहे. दरम्यान, गांधींच्या नेतृत्वात इंग्रज सरकारविरुद्ध फार मोठ्या प्रमाणावर देशभर अहिंसक जनआंदोलन लवकरच उभे राहील, अशा शब्दांत महासमितीने आपला निर्धार व्यक्त केला होता. त्यामुळेच गांधी, पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, अशा ज्येष्ठ नेत्यांना ९ ऑगस्टच्या पहाटेच इंग्रज सरकारने अटक करून अज्ञातस्थळी रवाना केले होते. सरकारने त्यांना कुठे ठेवले ह्याची गुप्तता पाळली होती. मात्र, तरी बातमी फुटलीच. गांधीजींना पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये आणि नेहरू, पटेल, आझाद या मंडळींना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आल्याचे समजले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आले. सरकारने लोकांना एकत्र जमण्यास बंदी घातली. पण लोक आता आदेश मानायला तयार नव्हते. पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले. यासर्व प्रकाराला सरकारने गांधीजींना जबाबदार ठरवले. त्याचा निषेधार्थ गांधीजीने २१ दिवसांचे अंदोलनही केले होते. प्रतिसरकारमुळे मूळ सरकार खवळेले आणि त्यांनी दडपशाही सुरू केली. त्यात हजारांहून अधिक मृत्यू, तितकेच जखमी, महिलांची विटंबना तर लाखोंना अटक केली होती, अशा नोंदी आहेत. ही चळवळ युद्धासारखी होती. या लढाईत योगदान देणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रांतिलढ्यांना वंदन!

दुसऱ्या महायुद्धात भारताने इंग्रजांना मदत केली. त्यावेळी इंग्रजांनी भारत सोडून जाण्याचे वचन दिले होते. मात्र ऐनवेळी दिलेला शब्द न पाळता इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्यास नकार दिला. त्यामुळे दि.८ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय काँग्रेस कमिटीच्या मुंबईतील अधिवेशनात भारत छोडो आंदोलनाचा प्रस्ताव संमत करण्यात आला. त्यानंतर इंग्रजांनी गांधींजींना पुण्यातील आगा खाँ तुरुंगात कैद केले. तसेच, स्वातंत्र्य चळवळीतील इतर नेत्यांनाही अटक करण्यात आली. त्यावेळी तरुण कार्यकर्त्या अरुणा असिफ अली यांनी ९ ऑगस्ट रोजी मुंबईतील ग्वालिया टँक मैदानात तिरंगा फडकावत भारत छोडो आंदोलनाचा शंखनाद केला. मात्र, गांधीजींनी हेही आंदोलन अहिंसक मार्गानेच करावे, असे आवाहन देशवासियांना केले होते. तरीही देशातील अनेक भागात हिंसा आणि तोडफोड करण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटीश सरकार अगोदरच खिळखिळे बनले होते. तर या आंदोलनामुळे ब्रिटीशांची उरली-सुरली ताकदही लोप पावत गेली. त्यानंतर देशवासियांनी इंग्रजांना हाकलून लावेपर्यंत हे आंदोलन सुरुच ठेवले. भारताला दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. या आंदोलनात आपले बलिदान देणाऱ्या नागरिकांना श्रद्धांजली म्हणून हा ऑगस्ट क्रांती दिन साजरा केला जातो. !! ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त सर्व देशप्रेमी भारतीयांना वंदे मातरम् !!

# भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील सुवर्ण पान : ऑगस्ट क्रांती दिन

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन चले जाव चळवळ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह कॉंगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती. या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते. त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८ रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना चले जावचा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली. तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आन्दोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते. सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.




प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

आत्मक्लेश करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. 'क्रांतीकारी' याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते.

या ऐतिहासिक 'चले जाव' आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर 'वंदे मातरम्' हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले. यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदायासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे फार मोठे धाडस होते. या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर सन १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट ॲटली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट ॲटली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले. इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर ॲटली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४६ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय. त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुल, १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला. ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला.भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो. भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८२ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

# दोन पावलांची काल्पनिक माघार

आधी भरपूर करवाढ करायची आणि नंतर आरडाओरडा झाला तर थोडी माघार घेतल्यासारखे दाखवायचे, ही कोणत्याही सरकारची ठरलेली खेळी असते. यंदा अर्थमंत्र्यांनी वस्तू आणि सेवा कराबाबत (जीएसटी) सगळ्या आशा धुळीला मिळवल्या. प्राप्तिकरात अगदीच मामुली सवलत दिली आणि घरविक्रीवरील भांडवली नफ्याची आकारणी मात्र मध्यमवर्गाला वाढीव फटका बसेल, अशी करून ठेवली.




अर्थसंकल्प सादर झाल्यापासून याबाबत सतत नाराजी आणि राग व्यक्त होता. त्याची दखल घेऊन सरकारने आता भांडवली नफ्याची आकारणी करताना करदात्यांना दोन पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. यामुळे, काही मोजक्या व्यवहारांमध्ये फायदा होऊ शकतो. मात्र, यातली खरी मेख 'इंडेक्सेशन' काढून टाकण्याची आहे. 'इंडेक्सेशन' म्हणजे भांडवली नफ्याची मोजणी करतानाचा किंमत महागाई निर्देशांक. ही तरतूद काढून टाकून सरकारने सर्व दीर्घकालीन भांडवली नफ्यावर साडेबारा टक्के इतका लावला होता. आधीची तरतूद इंडेक्सेशन करून वीस टक्के भांडवली नफा कर अशी होती. ती नव्या पद्धतीत जाणार होती आणि घरांच्या विक्रीमूल्यावर सरसकट साडेबारा टक्क्यांची कर आकारणी होणार होती. आता 'इंडेक्सेशन' किंवा किंमत निर्देशांक २३ जुलैपासूनच लागू होणार आहे. थोडक्यात, या आधी विकत घेतलेल्या घरांची किंवा अचल मालमत्तांची फेरविक्री होईल; तेव्हा जुन्या पद्धतीने इंडेक्सेशन करून वीस टक्के कर भरायचा की ते न करता सरळ साडेबारा टक्के कर भरायचा, याचा पर्याय वापरता येईल. या दोन्ही प्रकारे करमोजणी करून जी कमी असेल ती रक्कम कर म्हणून भरण्याची सुविधा मिळेल. मात्र, या नव्या सुविधेत मानसिक समाधान जास्त आणि प्रत्यक्षातील फायदा फारच थोड्या व्यवहारांमध्ये, असे होण्याची शक्यता आहे.मूळ मालमत्तेची किंमत आठ पटींपेक्षा जास्त झाली असेल तरच लक्षणीय फायदा होईल; असे दिसते. मुळात केंद्र सरकारला भांडवली नफ्यावर सरसकट कर घ्यायचा होता तर त्याची टक्केवारी आणखी थोडी कमी करता आली असती. इंडेक्सेशनमध्ये मालमत्तेची सध्याची किंमत मोजताना किंवा गृहित धरताना जी सापेक्षता येऊ शकते आणि त्यामुळे होणारे सरकारचे संभाव्य नुकसान टाळले आहे. मात्र, नवी करप्रणाली सरकारसाठी सोपी आणि नागरिकांच्या खिशात अधिक हात घालणारी असेल. अर्थमंत्र्यांनी दिलेल्या नव्या पर्यायात ती बदललेली नाही.

## मराठी पत्रकार परिषदच्या आरोग्य शिबिराला मोठा प्रतिसाद

# जिल्ह्यात १ हजारांच्या वर पत्रकारांनी सहभाग;नोंदवल्या बद्दल मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी मानले आभार

**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदशनाखाली पूर्ण राज्यात काल ३ डिसेंबर रोजी मराठी पत्रकार परिषद च्या ८६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या राज्यात जागोजागी रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी एकूणच जवळपास राज्यातून १० हजारांच्या वर पत्रकारांनी आपल्या परिवारासह या शिबिरात सहभाग नोंदवून आरोग्याची तपासणी केल्या बद्दल एस एम देशमुख यांनी मानले आभार.बीड जिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने काल बीड जिल्हा रुग्णालयात पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या शिबिराला मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.




बीड जिल्हात चांगलाच प्रतिसाद मिळाला आहे. जिल्ह्यातून सर्व अकरा तालुक्यातून मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. यात बीड, गेवराई, माजलगाव, परळी, अंबाजोगाई, धारूर, वडवणी, केज, आष्टी, पाटोदा, शिरूर(का.) या तालुक्यातून मराठी पत्रकार परिषद ने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आपल्या परिवाराच्या व स्वतःच्या आरोग्याच्या मोफत तपासण्या करून घेतल्या आहेत. व जवळपास १ हजारांच्या वर या शिबिरात रक्तदात्यांनी रक्तदान व आरोग्याची तपासणी केल्या बद्दल एस एम देशमुख यांनी मानले आभार. आहे. यावेळी मराठी पत्रकार परिषद चे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर, बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात,मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संजय हंगे, जिल्हा उपाध्यक्ष रवी उबाळे, बीड तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत,तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, अशोक खाडे,अनिल जाधव आदींनी उपस्थिती होती.पत्रकारांचे आरोग्य शिबीर सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत पार पडले यात बीड जिल्हा रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टरांनी सर्व पत्रकार बांधवांच्या तपासण्या केल्या यात डॉ.शहाणे,डॉ. पारखे, डॉ. काळे, डॉ.राऊत, व रक्त संक्रमण अधिकारी डॉ. कट्टे मॅडम,डॉ.नाईकवाडे मॅडम,डॉ.रोहिणी सवासे मॅडम तसेच रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी श्रीमती गालफाडे, रक्तपेढी तंत्रज्ञ सचिन स्त्कर, विनोद रावतळे, विनय कुंभार, सेवक दिलीप औसरमल या खूप मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले .या शिबीराचा बीड तालुक्यातील सर्व पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबीयांनी लाभ घेतला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या मार्गदशनाखाली संभाजीनगर विभागीय समन्वयक सुभाष चौरे, परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा परिषदे प्रमुख संजय हंगे ,जिल्हा उपाधयक्ष रवी उबाळे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यु घरत, संपादक राजेंद्र होळकर, हल्ला विरोधी कृती समितीचे तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, बीड तालुकाध्यक्ष दत्ता आजबे, कार्याध्यक्ष रेहान शेख, कोषाध्यक्ष प्रशांत लहुरीकर, सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींनी परिश्रम घेतले.

# कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत-अनिल जगताप

## नगर परिषदेने तात्काळ थकीत वीजबील भरून कलाकारांच्या नाट्यगृहाचा अंधार दूर करावा

**बीड । प्रतिनिधी**

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे असून याच कलाकारांना स्वतःच्या कलेचं सादरीकरण करण्याकरिता बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह एकमेव पर्याय आहे. मात्र कलाकारांच्या या नाट्यगृहाकडे बीड नगर परिषद वारंवार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसून येते आहे. राज्य नाट्य स्पर्धा ऐन तोंडावर आलेली असताना सध्य परिस्थितीत कलाकारांचं नाट्यमंदिर अंधारात धूळ खात पडलेलं आहे. काल रोजी नाट्यगृहाचे १ लाख २० हजार रुपये थकीत वीजबील दिले नसल्याने महावितरण अधिकाऱ्यांनी नाट्यगृहाचा वीज पुरवठा बंद केला आहे. बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांनी तात्काळ कलाकारांच्या नाट्यगृहाची वीज थकबाकी भरून नाट्यगृहातील अंधार दूर करावा. कलाकार शहराचे संस्कृतीक वैभव टिकवण्याचे काम करतात. या कलाकारांना कोणी वाली नाही असा गैरसमज मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांनी करून घेऊ नये. कलाकारांच्या पाठीशी कायम शिवसेना मोठ्या ताकदीने उभी आहे त्यामुळे कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत. असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांना दिला आहे.

गेल्या आठ ते नऊ महिन्यांपासून नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांचा पगार देखील नगर परिषदेने दिला नाही. गोरगरीब कर्मचारी रात्रंदिवस नाट्यगृहाची निगा राखतात, नाट्यगृहाची काळजी घेतात असे असताना जर त्यांचा महिन्यानुमहीने पगार होत नसेल तर ही बाब निष्काळजीपणाची आहे त्यामुळे मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची देखील लवकरात लवकर सोय करावी असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांना केले आहे.



## माळशिरस भाजपा सदस्य अभियानाचा बचेरी गावात शुभारंभ

**सांगोला । प्रतिनिधी**

माळशिरस भाजपा सदस्य अभियानाचा बचेरी गावात शुभारंभ भारतीय जनता पार्टी च्या वतीने सदस्य अभियान सुरू करण्यात आले असून देशभर सदस्य नोंदणी अभियान व ओळखपत्र तयार करण्याचा कार्यक्रम आखला असून या कार्यक्रमाची सुरुवात माळशिरस तालुक्यातील बचेरी या गावापासून करण्यात आली बचेरी या ठिकाणी श्रीराम मंदिरामध्ये विधानसभेला केलेल्या मतदाराचे आभार व भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा च्या वतीने बंडू यादव व मल्हार गोडसे यांना नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा नियोजन समिती सदस्य के के पाटील किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब वावरे नगरसेवक आकाश सावंत युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवराज पूकळे गणेश पाटील संजय देशमुख रामभाऊ गोरड गणेश देशमुख गणेश गोडसे अण्णासो पाटील आदी मान्यवरउपस्थित होते यावेळी बोलताना के के पाटील यांनी भारतीय जनता पार्टी सरकारने गेल्या पाच वर्षाच्या कामाची ची माहिती दिली व लाडकी बहीण योजना शेतकरी सन्मान योजना दुष्काळ निधी आदी योजना प्रभावीपणे राबवल्याने तालुक्यातील सर्व सामान्य जनता भाजपकडे



वळण्याची सांगितली यावेळी किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर यांनी निरादेवधरच पाणी तालुक्यातील बावीस गावांना आणण्यासाठी प्रयत्न करणार आणि हे काम भारतीय जनता पार्टीच करू शकते असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला यावेळी शिवराज पोकळे गणेश पाटील यांनी आपली मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने व महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

## महायुतीत सीएमपदावरुन रस्सीखेच नाही

# निरीक्षक आले की भाजपचा गटनेता निवडला जाईल मग सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा-चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–पक्षाचे निरीक्षक तर राज्यात येणारच आहे. ५ तारखेला संभाव्य मंत्रिमंडळाचा शपथविधी आहे. यात काही वावड्या डठवण्याची गरज नाही. निरीक्षक आले की नेते निवडले जातील, त्यातून सरकारचा मार्ग मोकळा होईल असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, कोणत्याही सरकार स्थापनेबद्दल चर्चा ह्या बातम्या आणि माध्यमांतील चर्चेवर होऊ शकत नाही. जो निर्णय घेतील तो देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे मिळून घेतील आणि त्याला आमचे केंद्रीय नेतृत्व मान्यता देईल. कुणी मिडीयाला काही बोलले तर सरकार स्थापन होत नसते असेही त्यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, संजय राऊत हे सध्या अस्वस्थ आहेत. त्यांचे आमदार कमी झाले. त्यांना कुणी विचात नाही. काँग्रेस आपला वेगळा विचार करत आहे. त्यामुळे ते अस्वस्थ आहेत. अशा मानसिकतेमध्ये लोक असेच बोलतात. स्वस्थ मानसिकतेमध्ये राऊत आले की त्यांचे आम्ही ऐकू.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, नागपूरमधील विरोधी पक्षनेत्याचा बंगला कुणाला देणार हे आम्हाला माहिती नाही. पण माझी मविआतील नेत्यांना विनंती राहणार आहे मी त्यांना सूचना देणार नाही, २०२९ मध्ये तिघांपैकी कुणाकडे तरी विरोधीपक्षनेते पद राहील याची काळजी घ्यावी. ऐवढी तयारी त्यांनी २०२९ पर्यंत केली पाहिजे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महायुतीमधील तिन्ही पक्षात कुठेच रस्सीखेच नाही. अजितदादा आणि आमच्यात कुठेच रस्सीखेच नाही. आम्ही मिडीयात एक अन् तिकडे एक बोलतो असे काही नाही. आम्ही तिघे सख्ये भाऊ एकत्र आहोत. सावत्र भाऊ हे एतच् वर बोट ठेवत वेळकाढू पणा करत आहे, असे म्हणत त्यांनी मविआवर टीकास्त्र डागले आहे. एकनाथ शिंदे हे प्रगल्भ नेते आहेत, त्यांच्याबद्दल वेगळ्या बातम्या पसरवणे योग्य नाही.

# ईव्हीएमवर संशय घेणं हा तर विरोधकांचा रडीचा डाव सुरू विरोधक आपला पराभव पचवू शकत नाहीत-राहुल नार्वेकर

**शिर्डी (वृत्तसंस्था)**–राज्यात महायुतीला विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे नवीन सक्षम, विश्वासू तसेच जनतेच्या मनातील सरकार स्थापन होण्याकरिता मी साईबाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहे. महाविकास आघाडीकडून एव्हीएम मशिनबाबत संशय घेतला जात आहे. ते आपला दारुण पराभव पचवू शकत नाही म्हणून असे आरोप करत आहे. हा त्यांचा रडीचा डाव आहे. पाच डिसेंबर रोजी महायुतीचे नवीन सरकार स्थापन होईल, असा विश्वास विधानसभा सभापती राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केला.शनिवारी राहुल नार्वेकर यांनी शिर्डी येथे साई समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर पत्रकारांची संवाद साधताना ते म्हणाले, यापूर्वीही २००४ मध्ये बहुमत मिळूनही सरकार स्थापन करण्यासाठी विलंब झाला होता. त्यामुळे हे साहजिकच असून मला विश्वास आहे की आम्ही ५ डिसेंबरपर्यंत चांगले आणि जनतेच्या मनातील नवीन सरकार स्थापन करू. सध्या



अनेक विरोधी पक्षाचे नेते म्हणतात की, निवडणुका बॅलेट पेपरवर घ्यायला हव्या होत्या. विरोधकांचा व महाविकास आघाडीच्या नेत्यांचा संविधानिक संस्था अर्थात सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय तसेच निवडणूक आयोग यांच्यावर विश्वास नाही का? ते बेजबाबदारपणे या सर्व संस्थेवर टीका करत आहे. म्हणून त्यांना भारताच्या संविधानानुसार किती विश्वास आहे, हे समजून येते. स्वतःचे अपयश झाकण्यासाठी त्यांनी आत्मचिंतन करण्यापेक्षा नवीन सरकार कधी स्थापन होईल, कोण मुख्यमंत्री होणार याचीच चिंता त्यांना वाटत आहे. नवीन सरकारमध्ये विरोधी पक्षनेता नसेल यावर बोलताना ते म्हणाले, यावर काही नियम आहे. काही क्ट आहेत. त्यानुसारच हे होईल. संजय राऊत यांनी भाजप हा विषारी साप असून तो डंख मारल्याशिवाय राहणार नाही, यावर उत्तर देताना नार्वेकर म्हणाले, खरं तर उबाठा शिवसेनेला कळायला हवे की त्यांच्यामध्ये अस्तीनचा साप कोण आहे आणि कुणामुळे तुमच्या पक्षाची अधोगती झाली, असा टोला संजय राऊत यांना त्यांनी लगावला. सध्या केंद्रीय वरिष्ठ नेते नवीन सरकार स्थापन करण्यासाठी महायुतीतील देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासोबत चर्चा व बैठक करत आहेत. या सर्वांनी केंद्रातील नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांनी घेतलेल्या निर्णयावर विश्वास दर्शवला असून लवकरच ५ डिसेंबरपर्यंत सक्षम सरकार स्थापन होईल.

कोल्ह्याला द्राक्षं आबंटच लागतात सध्या नवीन सरकारमध्ये एक व दोन क्रमांकाच्या पदासाठी रस्सीखेच सुरू आहे, यावर ते म्हणाले, असं कोणतेही एक, दोन किंवा तीन क्रमांकाचे पद नसते. अडीच वर्ष एकनाथ शिंदे यांच्यावर मेहरबानी करून भाजपने मुख्यमंत्रीपद दिले, या राऊत यांच्या वक्तव्याचा समाचार घेत कोल्ह्याला द्राक्ष आंबटच लागतात, अशी खोचक टीकाही राहुल नार्वेकर यांनी राऊत यांच्यावर केली.

# भाजपच्या विधिमंडळ पक्षाची बैठक २ दिवस लांबणीवर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होऊन ७ दिवस उलटले आहेत. भाजप, शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या महायुतीने २८८ पैकी २३० जागा जिंकल्या आहेत. मात्र शपथविधीबाबत अद्याप सस्पेंस कायम आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची तयारी दर्शवली असली तरी ते गृह मंत्रालयावर ठाम आहेत. २९ नोव्हेंबर रोजी दिल्लीत गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन शिंदे मुंबईत परतले आणि सर्व कार्यक्रम रद्द करून साताऱ्याला त्यांच्या गावी रवाना झाले. आता त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती आहे. मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करण्यासाठी साताऱ्याला गेले आहे.यासंबंधीच्या वृत्तानुसार, काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना १०५ अंश सेल्सिअसचा ताप आला आहे. यामुळे ते आज दिवसभर घराबाहेर पडले नाहीत. डॉक्टरांनी त्यांना घरातच सलाईन लावली आहे. ऐन राजकीय घडामोडींच्या काळातच शिंदे यांची प्रकृती बिघडल्यामुळे महायुती सरकारचा प्रस्तावित शपथविधी सोहळा आणखी लांबतो की काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.माजी मंत्री दीपक केसरकर हे आज एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी साताऱ्याच्या दरे या त्यांच्या गावी आले होते. पण शिंदेंची प्रकृती ठीक नसल्याचे कळताच त्यांना बंगल्याच्या गेटवरूनच आल्या पावली मुंबईच्या दिशेने माघारी फिरावे लागले.दुसरीकडे, भाजप विधिमंडळ पक्षाची बैठकही २ दिवस लांबणीवर टाकण्यात आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ही बैठक आता १ डिसेंबर ऐवजी ३ डिसेंबर रोजी होईल. याच दिवशी दिल्लीहून २ पर्यवेक्षक येतील. आमदारांशी चर्चा केल्यानंतर ते मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याची घोषणा करतील.त्यातच भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्याने दिव्य मराठीला सांगितले की, संघाने हिरवा कंदील दाखवल्यामुळे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यांचा शपथविधी ५ डिसेंबर रोजी दुपारी १ वा. मुंबईच्या आझाद मैदानावर होईल. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येकी एक उपमुख्यमंत्री त्यांच्यासोबत शपथ घेईल.शिंदे सरकारमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते होते. त्यांना हे मंत्रिपद सोडायचे नाही. आम्हाला उपमुख्यमंत्रीपद मिळत असेल तर गृहखातेही मिळायला हवे, असा शिंदे गटाचा युक्तिवाद आहे. शहा यांच्यासोबत झालेल्या बैठकीतही यावर तोडगा निघू शकला नाही.यापूर्वी गृहखाते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे होते. त्यामुळे फडणवीस कोणत्याही परिस्थितीत गृहमंत्रीपद सोडण्यास तयार नाहीत. या वादामुळे शहा यांच्या बैठकीत मंत्रिमंडळ स्थापनेवर कोणताही तोडगा निघू शकला नसल्याचे मानले जात आहे. गृहमंत्रीपद भाजप कधीही जाऊ देणार नाही, असेही जाणकारांचे मत आहे.दरम्यान, शिवसेना आमदार संजय शिरसाट म्हणाले की– शिंदे यांना कोणताही मोठा निर्णय घ्यायचा असेल तेव्हा ते त्यांच्या मूळ गावी जातात. आज संध्याकाळपर्यंत ते मोठा निर्णय घेतील. शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारतील असे मला वाटत नाही, असे शिरसाट यांनी यापूर्वी म्हटले होते.शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला एवढा मोठा विजय मिळाला, त्यामुळे बिहारच्या धर्तीवर तेच मुख्यमंत्री व्हावेत, असे शिवसेनेच्या काही नेत्यांचे म्हणणे आहे. बिहारमध्ये जेडीयूच्या जागा कमी असूनही मुख्यमंत्री नितीशकुमार आहेत. त्याचवेळी शिंदे यांनी उपमुख्यमंत्री व्हावे, असे पक्षातील काही नेत्यांचे मत आहे.



दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
वादळ वार्ता




# परळी विधानसभा मतदार संघात प्रतिष्ठीत नागरिकावर खोटे गुन्हे दाखल करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न

## अन्याय-अत्याचार विरोधी संघर्ष समितीच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन; कायदेशीर मार्गाने आंदोलनाचा इशारा

**परळी । प्रतिनिधी**

परळी विधानसभा मतदारसंघात गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक, राजकीय आदी क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिकावर सूडबुद्धीने गुन्हे दाखल करण्याचे काम पोलीस प्रशासनाला दबावाखाली घेत सुरू आहे. येथील प्रशासन राजकीय लोकांचे बटीक झाले आहे. परळी विधानसभा मतदारसंघात प्रतिष्ठित नागरिकावर खोटे गुन्हे दाखल करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या सर्व घटनांची तत्काळ दाखल संबंधितांनी घ्यावी. अन्यथा अन्याय- अत्याचार विरोधी संघर्ष समितीच्या वतीने कायदेशीर मार्गाने तीव्र अंदोलन करण्यात येईल व होणाऱ्या परिणामास पोलीस प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील असा इशारा अन्याय अत्याचार विरोधी संघर्ष समिती परळीच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालय परळी यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

याबाबत उपविभागीय अधिकारी परळी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परळी शहर व मतदार संघातील सामाजिक, राजकीय, प्रतिष्ठीत लोकांवरती कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता खोटे गुन्हे दाखल होत आहेत. यामुळे अशा दाखल होत असलेल्या गुन्हयामुळे शहरात व मतदार संघात



दहशतीचे व भितीचे वातावरण तयार झाले आहे. मतदार संघात लोकशाही कायदा व सुव्यवस्था आहे की नाही असे वाटू लागले आहे. पोलीस प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत आहे. खोटे गुन्हे दाखल करून घेत आहे. या अगोदरही कॉ. पी.एस. घाडगे, दत्ताप्पा ईटके, जुगलकिशोर लोहिया, करुणा मुंडे, बबनराव गित्ते, देवराव लुगडे, अशा अनेक व्यक्तीवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. मतदानाच्या दिवशी उमेदवार राजेसाहेब देशमुख व ॲड. माधवराव जाधव यांना पोलिसासमोर धक्का बुकी व मारहाण करण्यात आली. आतापर्यंत कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल केला गेला नाही. डॉ.यशवंत देशमुख यांच्यावरील ॲट्रोसिटी व विनयभंग हा खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. हा गुन्हा पूर्वनियोजित कटाचा भाग असूनही पोलीस प्रशासनाणे सखोल चौकशी न करता गुन्हा नोंद केला. फिर्यादी मुलीला गुन्हा दाखल करण्यासाठी कोणी पठवले या बाबीची चौकशी मुलीला अटक करुन करावी व सत्य बाहेर काढावे जेणे करून पुन्हा असे प्रकार घडणार नाहीत. प्रशासकीय व्यवस्थेवर प्रश्न उभे राहत आहेत. पोलिसांचे कर्तव्य सदरक्षणाय खलनिग्रहनाय आहे. दुष्टांचा संहार व चांगल्याना संरक्षण हे असून परळी मतदार संघात उलट परिस्थिती पहावयास मिळत आहे. अशा सर्व घटना पोलीस प्रशासनाच्या कार्यावर प्रश्न निर्माण करतात. या सर्व घटनांची तत्काळ दाखल घ्यावी. अन्यथा अन्याय अत्याचार विरोधी संघर्ष समिती कायदेशीर मार्गाने तीव्र अंदोलन करेल यांची नोंद घ्यावी व होणाऱ्या परिणामास पोलीस प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील. असेही या निवेदनात म्हटले आहे. सदरील निवेदनावर राजेसाहेब देशमुख, उत्तम माने, सय्यद हनिफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई, बालाजी काळे, ॲड.सतीश देशमुख, बाजीराव देशमुख राजेद्र पाटील, विश्वनाथ गायकवाड ,दत्ता गव्हाणे, वृक्षराज काळे, सुनील मस्के, पृथ्वीराज उंबरे, विश्वंभर मोरे, संदीपान काळे, विष्णु पतंगे, विजय देशमुख, गजानन नाईकवाडे, शाम देशमुख, दिपक सिरसाट , बाळासाहेब देशमुख, सुनील देशमुख,डिंगाबर कागले, देशमुख रविंद्र, संतोष साबळे, रमेश सोळंके, सिद्दिकी ऐतेशाम सर , शंकर शेजुळ, सोमनाथ भोसले, राजेंद्र पाटील, रंजित देशमुख, माणिक साबळे, अभिजीत देशमुख, हसन खान , आशोक शिंदे , संदीपान काळे , संदिप चौंडे ,आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत. मा. जिल्हाअधिकारी बीड, मा. उपविभागीय अधिकारी परळी वै., मा. तहसीलदार परळी वै., मा.पोलीस उपाधीक्षक अंबाजोगाई, शहर पोलीस ठाणे परळी यांना सदरील निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत.

# महामानवाला द्यावी शालेय साहित्य दान देऊन मानवंदना

**बीड । प्रतिनिधी**

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी वही-पेन दान करून अभिवादन करावे असे आवाहन महामानव अभिवादन ग्रुपने केले आहे. गेल्या ३ वर्षापासून महामानव अभिवादन ग्रुप वही - पेन दानातून गरजू व होतकरू गोर - गरीब आणि आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही, पेन व रजिस्टर) वाटप करीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन ६-१२-२०२३ ते क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांचा स्मृतिदिन २८ नोव्हेंबर २०२४ पर्यंत १९ ठिकाणी कार्यक्रम राबवून १०६१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले व विविध प्रबोधनात्मक



कार्यक्रम आयोजित करून मुलं,मुलींना शिक्षणाचे महत्त्व व सर्व थोर महापुरुषांच्या जीवनकार्याबद्दल माहिती दिली. तरी सर्व आंबेडकर प्रेमी दानदात्यांनी ६-१२-२०२४ च्या महापरिनिर्वाण दिन दानपारमितेचे पालन करून शालेय साहित्य व आर्थिक दान करावे, जेणेकरून वर्षभर गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले जाईल. असे नम्र आवाहन महामानव अभिवादन ग्रुप तर्फे करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांनी विजेत्यांची मानसिकता आत्मसात करावी-डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी वार्षिक क्रीडा स्पर्धांना सुरूवात झाली. अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते या क्रीडा महोत्सवाचे अतिशय जोशपूर्ण वातावरणात उदघाटन करण्यात आले.यावेळी संस्थेच्या प्राचार्या प्रा.गितांजली कुलकर्णी, प्रा.योगेश कुलकर्णी, सचिव शैलेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.गितांजली कुलकर्णी यांनी संस्थेच्या विविध क्रीडा स्पर्धा दरवर्षी होत असतात आणि या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारांमध्ये राज्यस्तरीय पातळीवर गेले आहेत. यापुढेही विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये संधी देत राहू अशी ग्वाही दिली. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी अभ्यासासोबतच क्रीडा नैपुण्य अत्यंत आवश्यक



आहे. कारण, शारीरिक आणि मानसिक संतुलन राखण्याचे काम विविध क्रीडा प्रकार करीत असतात. ज्ञानासोबतच शारीरिक आणि मानसिक तंदुरूस्ती आवश्यक आहे हे स्पष्ट करीत प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कुल अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांच्या क्रीडा आणि सांस्कृतिक कौशल्य विकासाबाबतीत सजग आहे. असे गौरवोद्गार त्यांनी काढले. केवळ जिंकण्यासाठीच नाही. तर जिंकलेल्या सर्वांसाठी आपण आनंद व्यक्त केला पाहिजे ही खिलाडूवृत्ती असली पाहिजे. जीवनामध्ये यश अपयश येत असते पण आहे. त्या परिस्थितीला स्वीकारून जिंकण्याची मानसिकता प्रत्येक विद्यार्थ्यांनी आत्मसात केली पाहिजे अशी अपेक्षा डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग नोंदवीत आपले क्रीडा नैपुण्य ही दाखवीले. पहिल्या दिवशी झालेल्या क्रीडा स्पर्धांचे बक्षिस वितरणही डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. या क्रीडा महोत्सवाचे आभार प्रदर्शन प्रा.योगेश कुलकर्णी यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेच्या सर्व शिक्षक, कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला.

# दिव्यांगांच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणार-आदित्य जीवने

**बीड । प्रतिनिधी**

दिव्यांगासाठी विविध शासकीय योजना आहेत. त्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणार असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी आज केले.जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सामाजिक न्याय भवन येथे मुख्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जीवने बोलत होते. दिव्यांगामध्ये अद्वितीय शक्ती असून त्यामुळे ते जिद्दीने व चिकाटीने यश संपादन करतात, असे प्रमुख वक्ते डॉ. अनिल बारकुल म्हणाले. प्रास्ताविक जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती एस. एन. मेश्राम यांनी केले. सूत्रसंचालन सुनील भोंडवे यांनी केले. आभार अंकुश नखाते यांनी मानले. कार्यक्रमास दिव्यांग




कर्मचारी संघटनेचे राजेंद्र लाड, रहीम शेख, खेळाडू ज्योतीराम घुले, आदिनाथ हाडोळे, तत्वशील कांबळे, अशोक तांगडे, शहरातील सर्व दिव्यांग शाळांचे मुख्याध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आदींची बहुसंख्येने उपस्थिती होती. जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत जागातिक दिव्यांग दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत रॅली काढण्यात आली. रॅलीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी हिरवा झेंडा दाखवला. रॅलीत सहभागी सर्व शिक्षक, नागरिक, दिव्यांग विविध शाळेतील विद्यार्थी व विविध दिव्यांग संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होते.

# शारदाबाई गुरुलिंगअप्पा मेनकुदळे माध्यमिक विद्यालय येथे जागतिक दिव्यांग दिन साजरा



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

नाथ शिक्षण संस्था परळी वैजनाथ संचलित सौ.शारदाबाई गुरुलिंगअप्पा मेनकुदळे माध्यमिक विद्यालय संगम येथे जागतिक दिव्यांग दिना निमित्त श्रीमती डॉ.हेलन केलर यांच्या प्रतिमेस शाळेतील सह शिक्षक श्री.बी.डी.केंद्रे सर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.उत्तम साखरे सर,श्री.रविंद्र गिराम सर,श्री.मदन कराड सर,श्री.राजाभाऊ राठोड सर,श्री अभिराज देशमुख सर,श्रीमती मयुरी मुळे मडम,श्रीमती मनिषा लांडे मडम, रवि मगर,मिलिंद नरबागे व विद्यार्थी उपस्थित होते.

# निवृत्ती वेतनधारकांना आयकर कपात, हयातनामाबाबत कोषागार कार्यालयाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

ज्या निवृत्ती वेतनधारक यांना आयकर भरावा लागतो. परंतु त्यांचे अर्ज बचतीसह जिल्हा कोषागार कार्यालयात विहित मुदतीत प्राप्त होणार नाहीत, अशा निवृत्ती वेतनधारकाचा आयकर जिल्हा कोषागार कार्यालयात आयकर नियमावलीनुसार कपात करण्यात येईल. त्यामुळे बचतीचे विवरण पत्र, पॅन कार्ड, मोबाईल क्रमांक कोषागार कार्यालयास ३१.१२.२०२४ पर्यंत सादर करावे.

तसेच सन २०२४-२५ च्या हयातनाम्यासाठी ज्या बँकेत निवृत्ती वेतन घेत आहेत, त्या शाखेत जाऊन माहे नोव्हेंबर २०२४ अखेर सही, अंगठा केला नसेल, अशा निवृत्ती वेतनधारकांनी कोषागारात १५.१२.२०२४ पर्यंत न चुकता हयातनामा जमा करावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी ल. पां. गळगुंडे यांनी केले आहे.

# एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत असे जनतेला वाटणे स्वाभाविक-गुलाबराव पाटील

**जळगाव (वृत्तसंस्था)**

एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत असे जनतेला वाटणे स्वाभाविक आहे. सगळ्या घटकांची कामे केल्यामुळे सहाजिकच जनतेची भावना आहे की त्यांनी मुख्यमंत्री व्हावे, असे शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे. तर पुढे बोलताना ते म्हणाले की, या विषयात स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझा कुठलाही अडचणीचा विषय नाही या शब्दात हा विषय खोडून टाकला आहे.गुलाबराव पाटील म्हणाले की, आदित्य ठाकरे हा सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेला माणूस आहे. आंदोलन करून आज आम्ही त्यांना मोठे केलेला आहे. नाहीतर आज ज्यांनी शिवसेनेला मोठे केले ते लोक कुठे आहेत, हे राऊत यांना विचारा असा टोला त्यांनी लगावला आहे. तर उद्धव ठाकरे यांनी संजय राऊत यांना ओळखावे नाही तर जे उरलेले २० आहेत ना त्यांच्यातील १० आमच्याकडे यायच्या तयारीत आहेत, असा खळबळजनक दावा पाटील यांनी केला. दिवाकर रावते कुठे आहेत, लीलाधर ढाके कुठे आहेत. महाडिकांच नाव कधी घेतलं जातं नाही. या सर्वांना ते विसरले आहेत. त्या महालामध्ये आमच्यासारख्याची सुद्धा एक वीट आहे. या सर्वांना विसरले म्हणून ते संजय राऊत सारखा एक दगड घेऊन आलेगुलाबराव पाटील म्हणाले की, सर्वप्रथम संजय राऊत यांना ॲडमिट केले पाहिजे त्यांनी पहिले शिवसेना संपवली आता राष्ट्रवादी संपवित आहेतसंजय राऊत पागल झाले आहेत. ते मेंटल झाल्यामुळे त्याच्या हातात आता दगड द्या. त्याने हातात दगड घ्यावे आणि भिवंडीच्या बाजारात फिरावे, असा सल्ला संजय राऊतांना दिलाय. येत्या काळात एकनाथ शिंदेंना संपूर्ण अधिकार हे शिवसेना पक्षाने दिलेले आहेत. त्यामुळे आता पुढे जे काही निर्णय घेतले जातील ते फक्त एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातूनच घेतले जातील.गुलाबराव पाटील यांचे जळगावमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून बॅनर लावले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077